दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५१३ वा ● शुक्रवार, ता. ६ फेब्रुवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल



'जे थकले, ते निघून गेले,' असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत विरोधी पक्षांच्या सभात्यागावर जोरदार टीका केली.


भाषणादरम्यान घोषणाबाजी करणाऱ्या विरोधकांवर टोला लगावत मोदी यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या वयाचा उल्लेख करत ''बसूनही घोषणा देता येतात'' असे म्हटले.

काँग्रेसच्या दीर्घ सत्ताकाळावर टीका करताना त्यांनी माजी पंतप्रधानांकडे दूरदृष्टी व इच्छाशक्तीचा अभाव होता, असा आरोप केला.

बोफोर्ससारख्या घोटाळ्यांचा उल्लेख करत मोदी म्हणाले की, विरोधकांनी नागरिकांच्या जीवनात बदल घडवण्याऐवजी केवळ सत्तेचा गैरवापर केला.

**नवी दिल्ली । रयत समाचार**

राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांवर तीव्र शब्दांत टीका केली. विरोधकांच्या सभात्यागावर भाष्य करताना ''जे थकले, ते निघून गेले'' असा टोला त्यांनी लगावला. पंतप्रधान मोदी भाषण करत असताना विरोधी पक्षांनी घोषणाबाजी करत व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना उद्देशून मोदी म्हणाले, ''आदरणीय खरगेजी, तुमचे वय पाहता उभे राहून घोषणाबाजी करू नका. बसूनही घोषणा देता येतात. मागे तरुण नेते आहेत.'' त्यांच्या या विधानावर सभागृहात क्षणभर शांतता पसरली. विरोधकांच्या वॉकआऊटवर टीका करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, काँग्रेसच्या दीर्घ सत्ताकाळात देशाची अशी अवस्था झाली होती की कोणताही देश भारताशी करार करण्यास तयार नव्हता. ''तुम्ही प्रयत्न केला असाल, पण कोणी तुमच्यासोबत काम करण्यास इच्छुक नव्हते,'' असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसच्या माजी पंतप्रधानांवर टीका करताना मोदी म्हणाले की, लाल किल्ल्यावरून झालेल्या त्यांच्या भाषणांत कोणताही स्पष्ट विचार, दूरदृष्टी किंवा इच्छाशक्ती दिसत नाही. याचे दुष्परिणाम देशाला भोगावे लागले, असे त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की काँग्रेस, टीएमसी, डीएमके आणि डावे पक्ष हे दशकानुदशके सत्तेत राहिले, मात्र त्यांची ओळख घोटाळ्यांपुरतीच मर्यादित राहिली. ''बोफोर्ससारख्या डील्समुळे त्यांच्या कारभाराची आठवण येते. त्यांनी नागरिकांच्या जीवनात बदल घडवण्याऐवजी स्वतःचे खिसे भरण्याचे काम केले,'' असा आरोप त्यांनी केला. काही राज्यांतील सरकारांवर टीका करताना मोदी म्हणाले की, ''दारूत बुडालेली सरकारे, काचेचे राजवाडे उभारणारे सत्ताधारी आणि जनतेकडे दुर्लक्ष करणारे हेच लोक आज प्रश्न विचारत आहेत. आरशात पाहिलं तर स्वतःचं सत्य त्यांना दिसेल,'' असे म्हणत त्यांनी विरोधकांवर टीकेची झोड उठवली.



## राष्ट्रवादी विलिनीकरणावर महायुतीत मतभेद

### शिंदेंच्या शिवसेनेचा शरद पवारांकडे कल

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर सुरू झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चेने नवे वळण घेतले आहे. शरद पवार यांनी अजित पवारांसोबत विलिनीकरणाबाबत चर्चा झाल्याचा दावा केल्यानंतर भाजपने ही शक्यता स्पष्टपणे फ टाळून लावली असताना, महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिंदेंच्या शिवसेनेने मात्र वेगळी भूमिका घेत शरद पवारांच्या म्हणण्यात तथ्य असल्याचे संकेत दिले आहेत. विलिनीकरणाची कोणतीही चर्चा झाली नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या नेत्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच अजित पवार गटातील नेतेही असा कोणताही निर्णय झाल्याचे नाकारत आहेत. मात्र या सर्वांपेक्षा वेगळा सूर शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्यांच्या वक्तव्यांतून पुढे येताना दिसत आहे. शिवसेनेचे नेते प्रताप सरनाईक यांनी विलिनीकरणाची चर्चा सुरू होती, अशी कुजबूज असल्याचे मान्य केले. तर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीच्या टायमिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, एवढ्या घाईने निर्णय का घेण्यात आला, अशी शंका व्यक्त केली. संजय शिरसाट यांनी तर ''माणसापेक्षा खुर्चीला जास्त महत्त्व दिलं गेलं,'' अशी थेट टिप्पणी करत शरद पवारांना या घडामोडींमध्ये विचारले गेले नसावे, असे सूचक विधान केले. दरम्यान, शरद पवार यांनी अजित पवारांसोबत १२ फेब्रुवारी रोजी विलिनीकरणाबाबत चर्चा होणार असल्याचा दावा केला होता. त्यावर मुख्यमंत्र्यांनी भाजपला विश्वासात न घेता असा निर्णय होऊ शकत नाही, असे सांगत शंका उपस्थित केली. त्याला उत्तर देताना शरद पवारांनी, ''जे चर्चेत नव्हते त्यांना विलिनीकरणाची माहिती कशी?'' असा सवाल केला. राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी मात्र विलिनीकरण सध्या पक्षाच्या अजेंड्यावर नसल्याचे स्पष्ट केले. अजित पवार यांनी निवडणुकीच्या दृष्टीने चर्चा झाल्याचे दोन मुलाखतींमध्ये सांगितल्याचा दाखला देत, शरद पवारांशी कोणताही वैयक्तिक दुरावा नसल्याचे त्यांनी नमूद केले. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीवरूनही राजकीय वातावरण तापले आहे. या निर्णयाचे समर्थन करताना प्रफुल्ल पटेल यांनी, कर्तव्यभावनेतून हा निर्णय घेतल्याचे सांगितले. मात्र या मुद्द्यावर विरोधकांसह शिंदेंच्या शिवसेनेतील काही नेत्यांनीही उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेकडे संख्याबळ असतानाही राष्ट्रवादीला सत्तेत सहभागी करून घेण्यात आले होते. आता अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीत सुरू असलेल्या अंतर्गत हालचालींमध्ये शिंदेंच्या शिवसेनेने घेतलेली 'शरद पवार पूरक' भूमिका राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. या स्वतंत्र भूमिकेचा महायुतीवर नेमका काय परिणाम होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गाढवाला गुळाची चव काय?

## रामदास कदम विकृतीच! भास्कर जाधवांचा संताप



**रत्नागिरी । रयत समाचार**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी माजी मंत्री व शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांच्यावर जोरदार टीका केली आहे. खेड येथील सभेत बोलताना भास्कर जाधव यांनी रामदास कदम यांच्या वक्तव्यांवर सडकून समाचार घेतला. ''रामदास कदम यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. ते कुठेही गेले तरी दुसऱ्याच्या नावाने शिव्या देतात. गाढवाला गुळाची चव काय, अशीच त्यांची अवस्था आहे,'' असा टोला लगावत कदमांनी आधी आपले चरित्र वाचावे, असा सल्लाही जाधव यांनी दिला. रामदास कदम यांना एकेरीतच बोलणार असल्याचे स्पष्ट करत भास्कर जाधव म्हणाले, ''माझा मुलगा कष्ट करून मोठा झाला आहे. पण तुम्ही हप्तेखोर आहात, हप्ते खाण्याचे काम करता.'' मुंबईतील बार संस्कृतीचा उल्लेख करत जाधव यांनी पुन्हा एकदा कदमांवर टीकेची झोड उठवली. ''रामदास कदम हा माणूस आहे की काय, हेच कळत नाही. ही एक विकृती आहे,'' असेही जाधव म्हणाले. यावेळी जाधव यांनी रामदास कदम यांच्या कुटुंबीयांशी संबंधित जुन्या प्रकरणाचाही उल्लेख केला. ''सख्ख्या भावाच्या घरात दिवाळीचा दिवा लागला नाही, कारण रामदास कदम यांनीच भावाला जेलमध्ये टाकले होते,'' असा गंभीर आरोप त्यांनी केला. कदमांची पापे इतकी मोठी आहेत की त्याची शिक्षा त्यांना भोगावीच लागेल, असा इशाराही जाधव यांनी दिला. खाडी पुलावरील कर्जी पुलाचा संदर्भ देताना जाधव यांनी कदम यांना मूर्ख ठरवत, टेंडर निघालेल्या पुलाचे अंदाजपत्रक करण्याच्या सूचना खुद्द रामदास कदम यांनीच दिल्याचा आरोप केला. या वक्तव्यांमुळे रत्नागिरी जिल्ह्यातील राजकीय वातावरण आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## पावसाळा सरासरीपेक्षा जास्त तरीही राज्यात पाणीटंचाई

### पुणे, बुलढाणा, उल्हासनगरमध्ये महिलांची पाण्यासाठी वणवण



**मुंबई । रयत समाचार**

राज्यात यंदा सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यमान झाले असले, तरी अवघ्या फेब्रुवारी महिन्यातच अनेक भागांत पाणीटंचाईचे चित्र निर्माण झाले आहे. पुणे, बुलढाणा आणि ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथे पाण्यासाठी महिलांचे हंडे मोर्चे निघाले असून, प्रशासनाच्या पाणी व्यवस्थापनावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

उन्हाळा सुरू होण्याआधीच पाण्याची टंचाई जाणवू लागल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. वेळेवर पाण्याचे नियोजन न झाल्यास येत्या काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बुलढाण्यातील रायपूर गावात तीव्र पाणी समस्या बुलढाणा जिल्हा मुख्यालयापासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या रायपूर गावात पाण्याची भीषण समस्या उद्भवली आहे. महाजल योजना, जलजीवन मिशन यांसारख्या विविध योजनांतून कोट्यवधी रुपये खर्च होऊनही गावाला नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त आहेत. महिलांनी दोन महिन्यांतून एकदाच पाणी मिळत असल्याची माहिती देत किमान आठवड्यातून एकदा तरी पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. या मागणीसाठी शेकडो महिलांनी जिल्हा परिषदेत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयावर मोर्चा काढत आपली कैफियत मांडली.उल्हासनगरमध्ये पाच दिवसांपासून पाणीपुरवठा बंद ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर शहरात गेल्या पाच दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. कॅम्प क्रमांक ५ परिसरातील रहिवाशांनी पाणीपुरवठा कार्यालयावर मोर्चा काढला.

यावेळी संतप्त नागरिक राजाराम पवार यांनी अर्धनग्न अवस्थेत दुचाकीवरून थेट पाणीपुरवठा कार्यालयात धडक देत पालिका अधिकाऱ्यांना जाब विचारला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. पुण्यात कृत्रिम पाणीटंचाईचा आरोप पुणे शहरातील कळस, गणेशनगर आणि बोपखेल परिसरात जाणूनबुजून कृत्रिम पाणीटंचाई निर्माण केली जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या रेखा टिंगरे व चंद्रकांत टिंगरे यांनी केला आहे. दुरुस्ती केल्यानंतर अवघ्या एका दिवसात जलवाहिनी पुन्हा फुटल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. दिशाभूल करणारे संदेश पसरवणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. राज्यातील विविध भागांतून समोर येणारी ही परिस्थिती पाहता, पाणीटंचाईवर तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## रस्ते अपघातांवर नियंत्रणासाठी बेळगाव पोलिसांची मोहीम



**बेळगाव । रयत समाचार**

जिल्ह्यात वाढत चाललेल्या रस्ते अपघातांवर नियंत्रण आणण्यासाठी पोलीस अधीक्षक के. रामराजन यांनी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांसह निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही थेट कारवाईचा इशारा त्यांनी दिला आहे. जिल्ह्यात वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळले जावेत यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत ट्रॅक्टरवर बसवण्यात आलेले २०० पेक्षा जास्त हाय-डेसिबल स्पीकर्स जप्त करण्यात आले आहेत. अशा प्रकारच्या उपकरणांमुळे ध्वनी प्रदूषण तर होतेच, शिवाय वाहनचालकांचे लक्ष विचलित होऊन अपघातांची शक्यता वाढते, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरमुळे वारंवार अपघात घडत असल्याने आता अशा वाहनांना रिफ्लेक्टर्स लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. रिफ्लेक्टर्स नसलेल्या वाहनांवर जप्तीची कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले आहेत. रस्त्यांच्या दुरवस्थेबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. महामार्गांवर लेन मार्किंग नसल्यामुळे अपघात घडत असल्याचे त्यांनी नमूद केले. संबंधित विभागाने तातडीने काम पूर्ण केले नाही, तर अभियंत्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल केले जातील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

'कुंपणच शेत खातेय का?'

## आश्रमशाळेत तंबाखू, गुटखा, मुलांच्या आर्थिक शोषणाचाही संशय

**कोपरगाव । किसन पवार**

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उभारलेल्या आश्रमशाळेतच जर आरोग्य आणि आर्थिक शोषणाचे प्रकार घडत असतील, तर ही केवळ निष्काळजीपणा नव्हे तर गंभीर प्रशासकीय अपयश मानावे लागेल.**

तालुक्यातील नगरमनमाड महामार्गालगत असलेल्या एका आध्यात्मिक ट्रस्टमार्फत चालविण्यात येणाऱ्या निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत आणि आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. शाळेच्या वसतिगृह व परिसरात सुरक्षा रक्षक असतानाही तंबाखूजन्य पदार्थांचा खुलेआम शिरकाव कसा होतो, याबाबत पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. या आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन विद्यार्थ्यांकडे गुटखा, तंबाखू यांसारखे पदार्थ आढळून येत असल्याने शाळा प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विद्यार्थ्यांच्या नियमित तपासणी, पेटी तपासणी आणि देखरेखीची जबाबदारी संबंधित कर्मचारी व वसतिगृह अधीक्षकांची असताना असे प्रकार घडत असल्याने ''कुंपणच शेत खाते आहे की काय?'' असा सवाल पालकांकडून केला जात आहे. पालकांनी दिलेल्या माहितीनुसार, काही विद्यार्थ्यांकडून दबावाखाली किंवा जबरदस्तीने त्यांच्या पेटीतून पैसे काढून घेतले जात असल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. या पैशांचा वापर तंबाखूजन्य पदार्थ खरेदीसाठी होत असल्याचा संशयही पालकांनी व्यक्त केला आहे. या प्रकारांमुळे अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या भयभीत झाले असून काही मुले भीतीपोटी हे प्रकार घरीही सांगत नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. आश्रमशाळा ही विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी असते; मात्र येथेच आरोग्याला घातक असलेले पदार्थ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत असतील, तर ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे पालकांचे मत आहे. काही पालकांनी तर हे प्रकार शाळेतीलच काही व्यक्तींच्या दुर्लक्षामुळे किंवा संगनमताने घडत असावेत, अशी शंका व्यक्त केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि आर्थिक शोषण थांबवावे, अशी जोरदार मागणी पालकांनी केली आहे. अन्यथा पालक एकत्र येऊन शिक्षण विभागासह पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत संबंधित आश्रमशाळा प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. (क्रमशः)

## मुंबई महापौरपदासाठी भाजपकडून तीन नावे चर्चेत

### उपमहापौरपदी शिंदे शिवसेनेतील दोन महिला उमेदवार आघाडीवर



**मुंबई । रयत समाचार**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्षपदाबाबत सुरू असलेला तिढा आता अंतिम टप्प्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात होणाऱ्या बैठकीनंतर महापौरपदाचा अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. महापौरपदासाठी भाजपकडून राजश्री शिरवळकर, रितू तावडे आणि शीतल गंभीर ही तीन नावे चर्चेत आहेत. तर उपमहापौरपद शिंदे शिवसेनेकडे जाण्याची शक्यता असून, त्यासाठी तृष्णा विश्वासराव आणि यामिनी जाधव यांच्या नावांवर विचार सुरू आहे. यंदा मुंबई महापालिकेचे महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव असल्याने मुंबईचा कारभार महिला महापौरांकडे जाणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे. महायुतीकडे स्पष्ट बहुमत असल्याने महापौरपद भाजपकडे जाण्यात कोणताही अडथळा नसल्याचे चित्र आहे.

भाजपचे ८९, शिंदे शिवसेनेचे २९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ३ असे एकूण १२१ नगरसेवकांचे संख्याबळ महायुतीकडे आहे. तसेच स्थायी समिती अध्यक्षपदही भाजपकडेच राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, मुंबई महापालिकेची निवडणूक बिनविरोध होणार का, याबाबत चर्चा सुरू असतानाच ठाकरे गटाची शिवसेना महापौर आणि उपमहापौरपदासाठी उमेदवार देण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. यासंदर्भात शिवसेना नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी सूचक विधान केले असून, ''आमची माणसं कामाला लागली आहेत,'' असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे ७ फेब्रुवारी रोजी ठाकरे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे. स्थायी समितीच्या रचनेबाबतही अद्याप अंतिम चित्र स्पष्ट झालेले नाही. स्थायी समितीत सध्या सत्ताधारी आणि विरोधकांचे प्रत्येकी १३ असे समसमान बळ आहे. त्यामुळे आपली ताकद वाढवण्यासाठी भाजप आणि शिंदे शिवसेना यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)शी चर्चा सुरू केली आहे. मात्र, स्वीकृत नगरसेवकाच्या अटीवरून ही चर्चा अद्याप निर्णायक टप्प्यावर पोहोचलेली नाही. मुंबई महापालिकेचा निकाल जाहीर होऊन जवळपास तीन आठवडे उलटले असले तरी आरक्षण, गटनोंदणी आणि राजकीय घडामोडींमुळे महापौरपदाचा निर्णय लांबला. आता ११ फेब्रुवारी रोजी मुंबईला नवी महापौर मिळणार असून, ती कोण असेल याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# संत विचारांची परंपरा जपणे काळाची गरज-आ. जगताप

## लाड सुवर्णकार समाजातर्फे संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सप्ताहाचा समारोप



**नगर । रयत समाचार**

भारतीय संस्कृतीत संतांनी अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालत समाजजागृतीचे कार्य केले असून माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संतांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४० व्या पुण्यतिथीनिमित्त लाड सुवर्णकार समाज विश्वस्त संस्था व युवक मंडळाच्या वतीने आयोजित सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कोर्ट गल्ली येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आयोजित कार्यक्रमात ह.भ.प. जनार्दन महाराज माळवदे यांचे काल्याचे कीर्तन झाले. संत शिरोमणी नरहरी महाराज हे विठ्ठल भक्तीचे महान पाईक असून त्यांच्या शिकवणीमुळे समाजात अध्यात्मिक मूल्यांची जपणूक होत असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले. कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष किशोर भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, पैलवान मनोज सुभाष लोंढे, संतोष ग्यानप्पा, नगरसेवक गणेश कवडे, नगरसेविका सौ. आशा डागवले तसेच समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ह.भ.प. माळवदे महाराज यांच्या हस्ते आमदार संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला. नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान संजय देवळालीकर यांनी केला, तर नगरसेविका सौ. आशा डागवले यांचा सन्मान सौ. कांचन निफाडकर यांनी केला.

सप्ताहानिमित्त आयोजित महाप्रसादासाठी रामु विनायक नांदुरकर, महिला भजनी मंडळ समन्वयक सौ. सुनीता कुलट व शहरकर परिवार यांचे सहकार्य लाभले. सात दिवस चाललेल्या या पुण्यतिथी सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी लाड सुवर्णकार विश्वस्त मंडळ, युवक संघटना व समाजबांधवांसह संजय देवळालीकर, मुकुंद निफाडकर, शरद कुलथे, सचिन देवळालीकर, प्रकाश देवळालीकर, जगदीश देडगावकर, श्याम मुंडलिक, विनोद कुलथे, योगेश नागरे, गणेश डहाळे, सुरेश मैड आदींचे सहकार्य लाभले.

# कॉंक्रिट रस्त्यांच्या देखभालीसाठी आधुनिक स्वच्छता यंत्रणा- नगरसेवक घुले




**नगर । रयत समाचार**

अहिल्यानगर शहरात सिमेंट कॉंक्रिटचे उच्च दर्जाचे रस्ते तयार झाल्यानंतर आता त्यांच्या आधुनिक पद्धतीने स्वच्छतेसाठी अत्याधुनिक यांत्रिक रस्ते स्वच्छता गाड्या उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. शहराच्या वाढत्या विस्ताराला आणि कॉंक्रिटीकरण झालेल्या रस्त्यांच्या देखभालीला अनुरूप अशी यंत्राधारित स्वच्छता व्यवस्था आवश्यक असल्याचे मत नगरसेवक अविनाश घुले यांनी व्यक्त केले. सध्या महापालिकेमार्फत नियमित स्वच्छता सुरू असली तरी आधुनिक मशीनच्या साहाय्याने अधिक प्रभावी स्वच्छता करता येणार आहे. यासाठी पहिल्याच जनरल बोर्ड बैठकीत इंदूर, पुणे व मुंबईच्या धर्तीवर स्वच्छता गाड्या उपलब्ध करून देण्याचा विषय मांडण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या संदर्भात आमदार संग्राम जगताप यांच्याशी सविस्तर चर्चा झाल्याचे सांगत शहर अधिक स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी करण्यासाठी सकारात्मक भूमिका असल्याचे नमूद करण्यात आले. आधुनिक यंत्रसामग्रीच्या मदतीने रात्रीच्या वेळेत रस्त्यांची स्वच्छता करण्यात येणार असून नागरिकांची वर्दळ कमी असल्याने काम सुरळीत पार पडेल. मागील स्वच्छता सर्वेक्षणात अहिल्यानगर महापालिकेला राज्यात पाचवा क्रमांक मिळाला होता. आगामी सर्वेक्षणात राज्य व देशपातळीवर पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून नागरिकांनीही स्वच्छता राखण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.





# वेळेवर निदानाने कॅन्सर बरा होऊ शकतो

## जिजामाता आरोग्य केंद्रात कॅन्सर जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**नगर । रयत समाचार**

जागतिक कर्करोग जनजागृती सप्ताहानिमित्त जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर, महानगरपालिकेचे जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र आणि अजय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कर्करोग तज्ज्ञ डॉ. सतीश सोनवणे लिखित कॅन्सरविषयक माहितीपूर्ण पुस्तिकांचे नागरिकांना वाटप करण्यात आले. कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर तपासणीचे महत्त्व तसेच उपचार पद्धती याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

जायंट्स ग्रुपचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी सांगितले की, योग्य वेळी निदान आणि उपचार केल्यास कॅन्सर पूर्णपणे बरा होऊ शकतो. सुमारे ४० टक्के कर्करोग तंबाखू व तत्सम व्यसनांमुळे होतात, त्यामुळे व्यसनमुक्ती आणि आरोग्याबाबत जागरूकता आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अजय फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती विद्या तन्वर यांनी कॅन्सरविरोधी जनजागृती कार्य सुरू ठेवण्यामागील वैयक्तिक अनुभव सांगत रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.फ कार्यक्रमाला महापालिका आरोग्य विभागाच्या डॉ. आयेशा शेख, रीना पवार, नूतन गुगळे, जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत, अनिल गांधी, अभय मुथा, डॉ. विनय शहा तसेच जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मनोरमा थोरात, माला साळवे, ज्योती तिवारी, सुरेखा डिके, रेखा गावंडे, आशा तांबे, दिक्षा पगारे, अनिता तिवारी, प्रिया इंगळे, दुर्गा चंद्रे, पल्लवी बिडकर, निर्मला राठौर, सोनाली पालवे, अंजू रासकर, विद्या फुलसौंदर आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# एमआयडीसीत झाडांची कत्तल; पर्यावरणप्रेमी संतप्त

## एल ॲण्ड टी गेट क्रमांक ३ समोर मोठ्या प्रमाणावर झाडतोड; कारवाईची मागणी



**नगर । रयत समाचार**

अहिल्यानगर शहरातील एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून पर्यावरणप्रेमी व नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

एल ॲण्ड टी कंपनीच्या गेट क्रमांक ३ समोरील परिसरात झाडांच्या फांद्या छाटण्याऐवजी थेट खोडापर्यंत झाडे तोडण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. नियमांनुसार झाडांची छाटणी किंवा तोड करण्यासाठी संबंधित विभागाची परवानगी आवश्यक असते. मात्र पावसाळ्याबाहेरील कालावधीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाडतोड करण्यात आल्याने ही कारवाई बेकायदेशीर असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सदर रस्ता एमआयडीसी कार्यालयाकडे जाणारा प्रमुख मार्ग असून रोज अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कंपन्यांचे प्रतिनिधी या मार्गावरून ये-जा करतात. अशा महत्त्वाच्या ठिकाणी झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल होऊनही प्रशासनाचे दुर्लक्ष कसे झाले, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनधिकृत ट्रान्सपोर्ट पार्किंगसाठी किंवा खासगी फायद्यासाठी ही झाडतोड करण्यात आली का, याबाबतही संभ्रम व्यक्त होत असून एमआयडीसी कार्यालयाच्या अगदी जवळ ही घटना घडूनही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने संबंधित विभागांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# श्री मार्कंडेय मंदिरात गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

## रविवारी अभिषेक, भजन, महाआरती, महाप्रसादाचे आयोजन

**नगर । रयत समाचार**

सद्गुरु श्री गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान, अहिल्यानगर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सालाबादप्रमाणे यंदाही भक्तिभावाने हा सोहळा साजरा करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थानचे उपाध्यक्ष त्रिलेश येनगंदुल यांनी दिली. प्रकट दिनी सकाळी श्रींचा अभिषेक, आरती आणि प्रसाद वाटप होणार आहे.

सायंकाळी ५ वाजता श्री अंबिका महिला भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता श्री सद्गुरु गजानन महाराजांची महाआरती तसेच सायं. ७.३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर रात्री ९ वाजेपर्यंत भजन संध्येद्वारे भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रींचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान समितीकडून करण्यात आले आहे.



# डॉ. कमर सुरुर आंतरराष्ट्रीय उर्दू परिषदेसाठी दिल्लीला निमंत्रित

**अहमदनगर । रयत समाचार**



उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय उर्दू भाषा विकास परिषद, नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय उर्दू परिषदेसाठी नगरचे डॉ. कमर सुरुर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ''बहुभाषिक भारतातील उर्दू भाषा आणि संस्कृती'' या विषयावर दिल्ली येथे तीन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेनिमित्त ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता जामिया मिलिया इस्लामिया, नवी दिल्ली येथील एम. ए. अन्सारी सभागृहात कविता वाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून त्यात डॉ. कमर सुरुर सहभागी होणार आहेत. उर्दू भाषा आणि साहित्याचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध चर्चासत्रे, अभ्यासक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. डॉ. कमर सुरुर यांनी यापूर्वीही देश-विदेशातील अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उर्दू परिषदांमध्ये सहभाग घेत नगरचे नाव उंचावले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल साहित्य क्षेत्रातून अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

# टाकळी काझी येथील श्री. गाडगेबाबा प्राथमिक आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय, वाचन उपक्रमाचे उद्घाटन



**नगर । रयत समाचार**

श्री. गाडगेबाबा प्राथमिक आश्रमशाळा, टाकळी काझी येथे क्रॉम्प्टन सीएसआर फाउंडेशन आणि विपला फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या तीन वर्षांपासून अप्रगत विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांचा एक भाग म्हणून नुकतेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी आणि ज्ञानाची गोडी लागावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. यावेळी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या क्रॉम्प्टन अहिल्यानगर विभागाच्या एचआर राधिका मालवदे यांनी विद्यार्थ्यांना गोष्टीचे वाचन करून दाखवले. तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत वाचनाचे महत्त्व सहज आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगितले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांसोबत वर्गातील भिंतींवर रेखाटलेल्या चित्रांना रंग देण्याचे कामही केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, हा अनुभव आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंददायी ठरला. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमधील कलात्मकता, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे असा विश्वास राधिका मालवदे यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास क्रॉम्प्टन सीएसआर फाउंडेशनकडून राधिका मालवदे यांच्यासह दिनेश बोरकर, प्रवीण पालवे तसेच विपला फाउंडेशनचे लोकेशन मॅनेजर कमलेश म्हंकाळे, भाग्यश्री वाळके उपस्थित होते. आश्रमशाळेचे अधीक्षक गांगरडे आणि शिक्षिका सुजाता औटी यांनी या उपक्रमासाठी सहकार्य केले. शिक्षणासोबत वाचन आणि कलात्मक उपक्रमांची जोड दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला.

रयत समाचार Classified
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?


✲ अधिक माहितीसाठी संपर्क ✲
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# श्रीरामपूर पालिकेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

## संभाजी महाराज पुतळा बसवण्यास मंजुरी; फ्लेक्स बोर्डसाठी नियमावली

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या कार्यकाळातील पहिली सर्वसाधारण सभा पालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात खेळीमेळीत वातावरणात पार पडली. विविध विषयांवर साधक-बाधक चर्चा करून सर्व ठरावांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष करण ससाणे होते. उपनगराध्यक्ष कांचन सानप व मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप व्यासपीठावर उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह इतरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. साडेअकरा वाजता सुरू झालेली सभा दुपारी तीन वाजता संपली. छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा बसवण्याच्या विषयावर सर्वाधिक चर्चा झाली. विविध नगरसेवकांनी जागेबाबत वेगवेगळ्या सूचना मांडल्यानंतर अखेरीस गोविंदराव आदिक सभागृहासमोरील जागेत पुतळा बसवण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



पूर्णाकृती पुतळ्यासंदर्भातील अहवाल शासनाकडे पाठवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. रेल्वे स्टेशनसमोरील जागेत १४ एप्रिलपूर्वी पुतळा उभारण्याचा मानस असल्याचे नगराध्यक्षांनी सांगितले. अतिक्रमण मोहिमेत विस्थापित झालेल्यांच्या पुनर्वसनासाठी शासकीय जागा उपलब्ध करून घेण्यासाठी पालकमंत्र्यांमार्फत प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. शहरातील फ्लेक्स बोर्डसाठी निश्चित जागा ठरवून नियमावली तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून विनापरवानगी बोर्ड लावणाऱ्यांवर कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. पाणीपुरवठा योजनेवरही

### पाणीपुरवठा व पुनर्वसन विषयांवर जोरदार चर्चा

सविस्तर चर्चा झाली. अनधिकृत नळ कनेक्शनधारकांना नोटीस देऊन कनेक्शन नियमित करण्याचे निर्देश देण्यात आले, अन्यथा पाणी चोरीचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा प्रशासनाने दिला. पंडित नेहरू उद्यानाचे 'नमो उद्यान' योजनेतून एक कोटी रुपयांत नूतनीकरण, शहरासाठी रिंग रोड प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणे, सीसीटीव्ही बसविणे, पालिका इमारतींवर सोलर पॅनल बसविणे, लोकमान्य टिळक वाचनालयात ई-लायब्ररी विकसित करणे, बिबट्यांच्या वाढत्या हालचाली लक्षात घेऊन पिंजरे खरेदी करणे आदी निर्णय सभेत घेण्यात आले. सभेदरम्यान विस्थापित पुनर्वसन समितीच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केल्याने नगराध्यक्षांनी शांततेचे आवाहन करत स्वतंत्र चर्चा करण्याचे आश्वासन दिले. विविध व्याख्यानमाला व पुरस्कारांसाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्याचा निर्णयही घेण्यात आला. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट करत नियमांची माहिती दिली. पालिकेतील रिक्त पदांमुळे कामकाजावर परिणाम होत असल्याचेही निर्दशनास आणण्यात आले. दरम्यान, शहरातील नवीन साठवण तलावाचे काम सुरू असल्याने पाण्याचा तुटवडा टाळण्यासाठी दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सम तारखांना शहराला पाणीपुरवठा करण्यात येणार असून नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.

### ससाणे यांच्या नेतृत्वाची चुणूक

**नगराध्यक्ष करण ससाणे हे पहिल्यांदाच नगराध्यक्ष झाले आहे .नगरसेवक पदाचाही त्यांना अनुभव नाही .परंतु कालची सर्वसाधारण सभा त्यांनी अतिशय कौशल्याने हाताळले .विरोधी सदस्यांच्या टीकेला फारसे महत्त्व न देता त्यांनी भाऊ,वहिनी,भाई अशा आपुलकीच्या शब्दांचा वापर करीत विरोधकांची ही मने जिंकली.पहिली सभा त्यांनी अत्यंत कौशल्याने हाताळल्याने भविष्यकाळातही ते समर्थपणे नगरपालिकेचा कारभार करतील याबाबत गॅलरीमध्ये चर्चा होती.**



## तहसील कार्यालयात हायटेक आधार सेवा केंद्राचा शुभारंभ

**श्रीरामपूर । रयत समाचार**

श्रीरामपूर येथील तहसील कार्यालयात नागरिकांच्या सोयीसाठी अमोल लबडे यांच्या 'आधार नोंदणी व दुरुस्ती केंद्राचा' बुधवारी दिमाखदार शुभारंभ करण्यात आला. या नवीन केंद्रामुळे आता श्रीरामपूरकरांना आधार संबंधित कामांसाठी इतरत्र पायपीट करावी लागणार नसून, जलद व सुलभ सेवा उपलब्ध होणार आहे. या केंद्राचे उद्घाटन श्रीरामपूरचे प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, अभया राजवाळ यांच्यासह तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांनी स्वतःच्या आधार कार्डावरील नाव व फोटो दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करून केंद्राच्या कामकाजाचा शुभारंभ केला. तसेच त्यांनी केंद्रातील उपकरणे व सुविधांची पाहणी करत सेवा देताना नागरिकांशी सौजन्याने वागण्याचे, शासकीय शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त पैसे न घेण्याचे आणि कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी या उपक्रमाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मध्यवर्ती ठिकाणी हे केंद्र सुरू झाल्याने सामान्य नागरिकांचा वेळ व श्रम वाचणार असून आधार सेवा अधिक सुलभ होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## लावणी सम्राज्ञी मालती इनामदार यांचा राज्यस्तरीय सन्मान

### देवगड यात्रेत कला सम्राज्ञी पवळा कला मंचाचा पुढाकार

**संगमनेर । रयत समाचार**

श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान ट्रस्ट, हिवरगाव पावसा येथे आयोजित यात्रा उत्सवानिमित्त प्रसिद्ध लोककलावंत व लावणी सम्राज्ञी मालती इनामदार यांना 'आद्यनृत्यांगणा नामचंद पवळा भालेराव हिवरगावकर लावणी सम्राज्ञी राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कला सम्राज्ञी पवळा कला मंच तसेच महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने हा गौरव सोहळा पार पडला. राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या हिवरगाव पावसा येथील यात्रा उत्सवात लोकनाट्य तमाशाचा मोफत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आद्यनृत्यांगणा नामचंद पवळा भालेराव हिवरगावकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी लोककलावंतांना सन्मानित करण्याची परंपरा कायम ठेवत यंदा मालती इनामदार यांच्या तमाशा क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानाचा गौरव करण्यात आला. विठाबाई नारायणगावकर यांच्या कन्या असलेल्या मालती इनामदार यांनी वयाच्या दहाव्या वर्षापासून तमाशा क्षेत्रात पदार्पण केले. गेल्या ४६ वर्षांपासून त्यांनी विनोदी भूमिकांद्वारे रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले असून 'थडग्यातून उठली सून', 'आई तुझं लेकरू', 'आता मला खुशाल फाशी द्या', 'मुंबईची केळीवाली' यांसारखी अनेक पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक व धार्मिक वगनाट्ये राज्यभर गाजली आहेत. लोककला जिवंत ठेवण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात आला. या प्रसंगी डॉ. प्रमोद पावसे, सोमनाथ भालेराव, भीमाशंकर पावसे, बाबुराव पावसे, बाबासाहेब पावसे, नितीनचंद्र भालेराव, मथाजी पावसे, रोहिणी भालेराव, नारायण पावसे, संतोष पावसे, अनिल गडाख, गणेश शिंदे, सोमनाथ पावसे यांच्यासह देवगड देवस्थानचे विश्वस्त, ग्रामस्थ आणि कला प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनतेच्या कुटुंबातील सदस्य म्हणून काम करणार- आ. विठ्ठलराव लंघे

## तेलकुडगावात विविध विकास कामांचे भूमिपूजन

**नेवासा । रयत समाचार**

नेवासा तालुक्यातील तेलकुडगाव येथे विविध विकास कामांना गती देण्यासाठी ५९ लाख रुपयांच्या कामांचे भूमिपूजन आमदार विठ्ठलराव लंघे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामीण भागातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून तालुक्यातील प्रत्येक गावाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास आमदार लंघे यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा सौ. सुमतीताई साहेबराव घाडगे-पाटील या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प. अमोल महाराज घाडगे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल, अंकुशराव काळे-पाटील, बबनराव



पिसोटे, प्रमोद गजभार, सतीशराव काळे, काकासाहेब काळे, मधुकर घाडगे, ज्ञानेश्वर काळे, बालकनाथ काळे, मुरलीधर काळे, बाबुराव काळे, अरविंद घाडगे, नामदेव अण्णा घोडेचोर, मच्छिंद्र मुंगसे, पोपटराव सरोदे, संभाजी लोंढे, निलेश कोकरे, संजय घोडेचोर, सोपान शेंडगे, दत्तू काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

जनतेने दिलेल्या संधीचे सोने करून विकासकामांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य दिले जाणार असल्याचे सांगताना आमदार लंघे म्हणाले की, तालुक्यातील जनतेने लंघे-पाटील परिवारावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला जाणार नाही. आपण जनतेच्या कुटुंबातील सदस्य असल्याप्रमाणे काम करत राहू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या भूमिपूजन कार्यक्रमास गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिलावर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी आमदार लंघे-पाटील आणि मान्यवरांचे गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढून फटाक्यांच्या आतषबाजीत जंगी स्वागत करण्यात आले.

## योगासन स्पर्धेत प्रा.भवर महाराष्ट्रात प्रथम

### स्पर्धेत १०६.८ गुणांसह अव्वल कामगिरी

**संगमनेर । रयत समाचार**



राज्यस्तरीय शिक्षक-अधिकारी योगासन स्पर्धेत संगमनेर येथील प्रा. सुरेखा ठकाजी भवर यांनी प्रथम क्रमांक मिळवत महाराष्ट्रात अव्वल स्थान पटकावले आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे आयोजित स्पर्धेत त्यांनी १०६.८ गुण मिळवत देदीप्यमान कामगिरी केली. प्रा. भवर या शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रमिक ज्युनिअर कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी तालुका स्तरावर संगमनेर, विभागीय स्तरावर पुणे आणि अंतिम राज्यस्तरीय फेरीत नांदेड येथे प्रथम क्रमांक पटकावत तिन्ही टप्प्यांत सलग यश मिळवले. अचूकता, संतुलन आणि आकर्षक सादरीकरणामुळे त्यांनी परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या या यशामुळे श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयाचा लौकिक राज्यभर पोहोचला असून भावी पिढीसाठी हे प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष तथा आशियाई योगासन महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी विशेष कौतुक केले. तसेच संस्थेचे सचिव डॉ. अनिल राठी, खजिनदार राजकुमार गांधी, जनरल सेक्रेटरी सीए नारायण कलंत्री, प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र ढमक, पर्यवेक्षक प्रा. आप्पासाहेब गुंजाळ यांनी अभिनंदन केले. याशिवाय संगमनेर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, डीआयईटी अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर तसेच वरिष्ठ अधिव्याख्याता अरुण भांगरे यांनीही प्रा. भवर यांचे कौतुक केले. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अनेक दशकांपासून बंद असलेला शिवरस्ता अखेर खुला

## शेतकऱ्यांना दिलासा ढोरजळगाव तेलकुडगाव मार्ग अतिक्रमणमुक्त

**शेवगाव । लक्ष्मण मडके**


स्वातंत्र्यकाळापासून प्रलंबित असलेला ढोरजळगाव (ता. शेवगाव) ते तेलकुडगाव (ता. नेवासा) दरम्यानचा अंदाजे साडेतीन ते चार किलोमीटर लांबीचा शिवरस्ता अखेर शेतकऱ्यांसाठी खुला करण्यात आला आहे. प्रशासनाच्या विशेष मोहिमेमुळे अवघ्या चार दिवसांत अतिक्रमण हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याने दोन्ही गावांतील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सीमावाद, तांत्रिक अडचणी, नोंदीतील त्रुटी आणि स्थानिक स्तरावरील विरोधामुळे हा मार्ग अनेक दशकांपासून बंद होता. परिणामी शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी लांब व अवघड मार्गाचा



वापर करावा लागत होता. शेतीची अवजारे, खते-बियाणे तसेच पिकांची वाहतूक करताना वेळ, श्रम आणि खर्च वाढत होता. गेल्या काही वर्षांपासून प्रशासनाने हा रस्ता खुला करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले होते. महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग आणि पोलीस प्रशासन यांनी संयुक्त नियोजन करून समन्वयातून हा प्रश्न मार्गी लावला. भूमी अभिलेख विभागाने अचूक मोजमाप करून शिवरस्त्याची सीमारेषा निश्चित केली, तर महसूल व पोलीस प्रशासनाने शांततेत कारवाई पूर्ण केली. प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांनी मोहिमेला प्राधान्य देत प्रत्यक्ष स्थळी उपस्थित राहून सर्व विभागांमध्ये समन्वय साधला. कोणताही वाद न वाढवता कायदा व सुव्यवस्था राखत चार दिवसांत रस्ता खुला करून प्रशासनाने कार्यक्षमतेचा आदर्श निर्माण केला. या निर्णयामुळे परिसरातील सुमारे २०० ते २५० शेतकरी कुटुंबांना थेट लाभ होणार आहे. शेतीसाठी जाणे-येणे तसेच शेतमाल वाहतूक सुलभ होऊन वेळ, खर्च आणि श्रमांची बचत होणार आहे. प्रशासनाच्या तत्परतेबद्दल ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तहसीलदार आकाश दहाडदे म्हणाले, ''ढोरजळगाव ते तेलकुडगाव हा शिवरस्ता शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेला होता. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न कायदेशीर व शांततेच्या मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न यशस्वी झाला. शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासन सदैव तत्पर राहील.''

## सावेडीतील भारत कुलकर्णी यांचे ७७ व्या वर्षी निधन

**अहिल्यानगर/रयत समाचार**



सावेडी उपनगरातील श्री भारत नारायणराव कुलकर्णी (वय ७७) यांचे अल्प आजारानंतर नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ते अत्यंत मनमिळाऊ, प्रेमळ आणि सामाजिक स्वभावाचे होते. त्यांनी आपल्या आयुष्यात साधेपणा, प्रामाणिकपणा आणि आपुलकीने सर्वांच्या मनात स्थान निर्माण केले. समाजातील प्रत्येक घटकांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा आप्तेष्ट परिवार आहे. कुलकर्णी परिवारातील हे ज्येष्ठ व्यक्तिमत्व हरपल्याने सावेडी परिसरात शोककळा पसरली आहे.

# गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज चौथा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# मिरी अत्याचार प्रकरण पेटले

## दलित पँथर संघटनेचे आरोपींच्या अटकेसाठी धरणे आंदोलन

**पाथर्डी । रयत समाचार**

पाथर्डी तालुक्यातील मिरी गावातील अनुसूचित जातीच्या मिरपगार कुटुंबावर झालेल्या कथित अत्याचार प्रकरणात आरोपींना तात्काळ अटक करावी तसेच संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी या मागण्यांसाठी दलित पँथर संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

२२ जानेवारी २०१६ रोजी पाथर्डी पोलीस ठाण्यात प्रेरणा दानियल मिरपगार यांच्या फिर्यादीवरून अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या प्रकरणात जातीय शिवीगाळ, धमक्या, शासकीय मंजूर घरकुल व शौचालय पाडण्याची बेकायदेशीर कारवाई, मारहाण तसेच बौद्ध समाजाच्या प्रतीकांचा अपमान अशा गंभीर आरोपांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले.



मात्र कायदा लागू असूनही मुख्य आरोपींना अटक न झाल्याने संताप व्यक्त करण्यात आला. संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी आरोपींना अप्रत्यक्षपणे पाठीशी घालत असल्याचा आरोप करण्यात आला. पाथर्डी पोलीस ठाण्यातील पीएसआय आगरकर यांच्यावर कर्तव्यात कसूर, पदाचा गैरवापर व बेकायदेशीर कारवाईस मदत केल्याचे आरोप असूनही कारवाई न झाल्याची तक्रार आंदोलनकर्त्यांनी केली. मिरी गावातील तात्पुरते कार्यभार सांभाळणारे ग्रामसेवक, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना शासकीय मंजूर बांधकाम पाडण्यास मदत केल्याचा आरोपही करण्यात आला.

तसेच बौद्ध समाजाचा सार्वजनिक रस्ता अद्याप अतिक्रमणमुक्त न केल्याबद्दल प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप करण्यात आला. पीडित कुटुंब दहशतीखाली जीवन जगत असल्याने आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी अत्याचार प्रतिबंध अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर विभागीय व फौजदारी कारवाई, संबंधित अधिकाऱ्यांची स्वतंत्र चौकशी, सार्वजनिक रस्ता अतिक्रमणमुक्त करणे तसेच पीडित कुटुंबाला संरक्षण व शासकीय लाभ देण्याच्या मागण्या केल्या. या धरणे आंदोलनात दलित पँथर संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदित्य भाई कदम यांच्यासह प्रेरणा मिरपगार, प्रीती मिरपगार, सतीश मिरपगार, दानियल मिरपगार, सविता मिरपगार, शोभा मिरपगार, रवींद्र मिरपगार, अमोल मिरपगार, रंजना मिरपगार, उषाबाई पाटोळे, मिल्का मिरपगार, अनिता मिरपगार, लता मिरपगार, कविता भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

# खेळासोबत सामाजिक बांधिलकी

## युवकांचा आदर्श उपक्रम पिंपळगाव माळवीत ‘गावकरी चषक २०२६’ उत्साहात

**नगर । रयत समाचार**

गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून पिंपळगाव माळवी येथे ‘गावकरी चषक २०२६’ ही क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेनंतर सामाजिक जबाबदारी जपत बक्षीस व स्पर्धेतील उर्वरित रकमेतून गावातील मंदिरांना कचराकुंड (डस्टबिन) भेट देत युवकांनी स्वच्छतेचा संदेश दिला. या स्पर्धेत गावातील प्रत्येक वार्डमधून १५ खेळाडूंचा सहभाग घेऊन एकूण पाच संघ तयार करण्यात आले होते. त्यामुळे तब्बल ७५ खेळाडूंनी स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदवला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील युवा खेळाडू, सरपंच, उपसरपंच तसेच विविध वार्डातील कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



चंद्रकांत काळे, योगेश वाघ, सचिन झिने, प्रवीण खांडके, गणेश निकम, भरत गुंड, राहुल झिने आदींनी विशेष योगदान दिले. आयपीएस वैभव गायकवाड यांनी सर्व खेळाडूंना आकर्षक टी-शर्ट प्रदान केले. स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी ११ हजार १११ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७ हजार ७७७ रुपये रोख पारितोषिक देण्यात आले. उत्तेजनार्थ बक्षिसे शुभम शेठ बोरा यांनी दिली. तसेच एस कन्स्ट्रक्शन व रुद्र कन्स्ट्रक्शनचे मालक राहुल झिने व विजय वामन यांच्या हस्ते विजेत्या संघांना ट्रॉफी व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. बक्षीस वितरणानंतर उर्वरित निधीतून गावातील समाज मंदिरात उपयुक्त काम करण्यात आले. या रकमेतून गावातील सर्व मंदिरांना प्रत्येकी एक कचराकुंड देण्यात आले.

या वेळी उपसरपंच मच्छिंद्र झिने, मेजर विश्वनाथ गुंड, ग्रामपंचायत सदस्य सागर गुंड, बापू बेरड, संजय प्रभुणे, विश्वनाथ झिने, ज्ञानदेव गुंड, संकेत शिंदे, तुकाराम झिने, पुजारी भाऊसाहेब बैरागी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या युवकांच्या सामाजिक उपक्रमामुळे पर्यावरण स्वच्छता आणि गाव सुशोभीकरणाला हातभार लागला असून स्पर्धेमुळे खेळाडूवृत्तीबरोबरच सामाजिक एकतेची भावना अधिक दृढ झाल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.


# कॉस्को बॉल हाफपिच नाईट क्रिकेट स्पर्धेचे बेलवंडी बु. येथे आयोजन

**श्रीगोंदा । रयत समाचार**

महाराजा सोशल फाउंडेशनबेलवंडी व मोरया प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ‘उद्योजक चषक २०२६’ अंतर्गत भव्य कॉस्को बॉल हाफपिच नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



ही स्पर्धा शनिवार दि. ८ फेब्रुवारी ते बुधवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत उत्साहात पार पडणार आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी ३१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २१ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार असून, विविध वैयक्तिक कामगिरीसाठी आकर्षक बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी प्रवेश फी २,५०० रुपये ठेवण्यात आली असून, परिसरातील क्रिकेटप्रेमी संघांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेचे आयोजन भव्य प्रकाशझोतात (नाईट मॅच) करण्यात येणार असून पंच, समालोचक, स्कोअरर तसेच लाईट व साऊंड व्यवस्थेसह उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच स्पर्धेचे थेट प्रक्षेपण यूट्यूब लाईव्हद्वारे करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. ही स्पर्धा बाजारतळ, पोलिस स्टेशन रोड, बेलवंडी बु. येथे आयोजित करण्यात आली असून अधिक माहितीसाठी ९६५७२४४५५० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# जवाहर विद्यालयात आठवणींच्या साक्षीने बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**नेवासा । रयत समाचार**

नेवासा तालुक्यातील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चांदा येथे इयत्ता बारावी कला व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना काव्यवाचनातून भावपूर्ण निरोप देण्यात आला. विद्यालयाच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात आयोजित कार्यक्रम प्राचार्य अंशुमन वाकचौरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि शिक्षकवृंदांच्या उपस्थितीत पार पडला.

या वेळी कुसुमाग्रज गौरव पुरस्काराने सन्मानित, ‘साहेब’ या टोपण नावाने काव्यलेखन करणारे शीघ्रकवी व विद्यालयाचे प्रसिद्धी विभाग प्रमुख काव्यरत्न प्रा. रावसाहेब राशिनकर यांनी स्वलिखित ‘निरोपाची वेळ’ या कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. प्रा. ज्योती झिने, प्रा. रंजना काकड, प्रा. दिलीप ससे, प्रा. भाऊसाहेब पानसरे तसेच ज्येष्ठ शिक्षिका विनया राजगुरू यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांपैकी समीक्षा भारशंकर, साक्षी काळे, साक्षी चांगुलपाई, प्रिया रासकर, प्रतीक्षा दहातोंडे, साक्षी चिंतामणी, सार्थक दहातोंडे आणि वैभव दहातोंडे यांनी मनोगत व्यक्त करत विद्यालयातील आठवणी आणि शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी उपप्राचार्य रघुनाथ भोजने, पर्यवेक्षक राजेश शेंडगे, प्रा. भगवान भाबड, प्रा. संदीप बुचकूल, प्रा. कृष्णा शेंडे, प्रा. अनिता रहाणे, प्रा. वैशाली ठोंबरे, प्रा. सोनू फुंदे, प्रा. पल्लवी उगले, सांस्कृतिक विभाग प्रमुख स्वाती दळवी, रुख्मिणी सोनवणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्युनियर कॉलेज समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे यांनी केले. विद्यार्थिनी वर्षा क्षीरसागर व पल्लवी दहातोंडे यांनी सूत्रसंचालन केले, तर रिद्धी पुंड हिने आभार प्रदर्शन केले.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर,
दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय
इमारत,आकाशवाणीसमोर, सावेडी,
अहिल्यानगर -४१४००३
जावक क्रमांक/३६०/२०२६
दि. ३०/०१/२०२६

**चौकशीची जाहीर नोटीस**

**चौकशी अर्ज क्रमांक - १६/२०२६**
**न्यासाचे नाव - दसमहाविद्या सेवा ट्रस्ट**
**न्यासाचा पत्ता -** २०३, सुमंगल अपार्टमेंट, निवारा, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर
**अर्जदार- श्री. ब्रिजभुषण मणिलाल प्रसाद**
**सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,**

मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**अ) जंगम मिळकत - रोख रक्कम ५४,०००/- (रुपये चोपन्न हजार मात्र) अध्यक्षांकडे जमा.**
**ब) स्थावन मिळकत - (वर्णन) - काही नाही**
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल, त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल,व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
**ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दि. २९/०१/२०२६ रोजी दिली.**

कोर्टाचा शिक्का

**न्यायलिपीक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

**अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर